॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १०८ वा ❑ शनिवार दि.०७ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

### वरिष्ठ व निवड श्रेणीच्या प्रशिक्षणाकरिता जाचक अटी का?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

सध्या शिक्षकांचे वरिष्ठ व निवडश्रेणी चे प्रशिक्षण सुरू आहे..प्रशिक्षण प्राप्त करण्यासाठी शिक्षकांना अनुक्रमे १२ वर्षं व २४ वर्ष सेवेची अट घालण्यात आली आहे..प्रशिक्षण ऑफ लाइन पद्धतीने सुरू असले तरी प्रशिक्षणा दरम्यानची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन प्रक्रियेद्वारे करायची आहे.मात्र ऑन लाईन प्रक्रियेतील अटी अतिशय जाचक असून शिक्षकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. शिक्षणा दरम्यान अनेक तांत्रिक अडचणी येत असल्याने अनेक शिक्षक प्रशिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. दर तासाला ऑन लाईन उपस्थिती घेणे,अपलोड करणे,ऑन लाईन लिंक भरणे,अशा विविध अडचणींना तोंड द्यावे लागत आहे,त्यामुळे शिक्षक मेटाकुटीस आले आहे.

विशेष म्हणजे प्रशिक्षणकरिता २ हजार रुपये आकारण्यात आले आहे.सात ते आठ तास चालणाऱ्या प्रशिक्षणात चहा आणि भोजनाची देखील व्यवस्था करण्यात आली नाही.सुविधांअभावी शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे..आधी प्रशिक्षण नि:शुल्क व्हायचे..दरम्यान शिक्षकांना सर्व भौतिक सुविधा,जेवणाची व्यवस्था देखील मिळायची.मात्र आता शिक्षण विभागाने या सर्व सुविधांना कात्री लावत अनेक जाचक निर्बंध प्रशिक्षणार्थ्यांवर टाकल्या आहेत.यामुळे अनेक शिक्षक संघटनांनी रोष व्यक्त केला आहे..प्रशिक्षणार्थ्यांवर इतक्या जाचक अटी नसाव्या,असे अनेक शिक्षकांसह व शिक्षक संघटनांची मागणी आहे..शिक्षकांची मागणी रास्त आहे..भौतिक व इतर तत्सम सुविधा मिळायला पाहिजे..उन्हाळ्याचे दिवस आहे..सूर्य तापत आहे..अधून मधून पाऊस पडत असल्याने उकाड्याचा त्रास शिक्षकांना होत आहे.ऑन लाईन प्रणाली मध्ये सुधारणा करण्याची व प्रशिक्षण नि:शुल्क करण्याची गरज आहे.

**प्रशिक्षण आवश्यक का आहे?**

रिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी अनेक अटी असल्या, तर त्या सरकारी धोरणांचा भाग आहेत आणि त्या अनेक कारणांसाठी आहेत. या अटींमुळे, योग्य आणि अनुभवी कर्मचाऱ्यांची निवड होते, तसेच सरकारी कामांच्या मानकांचे पालन होते.

वरिष्ठ आणि निवड श्रेणी मिळवण्यासाठी, कर्मचाऱ्यांनी आपल्या कामात निश्चित यश मिळवले पाहिजे, तसेच त्यांच्याकडे योग्य कौशल्ये आणि अनुभव असावा. या अटींमुळे, उच्च दर्जाचे काम करणारे कर्मचारी या श्रेणीसाठी निवडले जातात.

काही वेळा, वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी, कर्मचाऱ्यांनी विशेष प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे लागते. हे प्रशिक्षण त्यांना नवीन कौशल्ये आणि ज्ञान प्राप्त करण्यास मदत करते, जेणेकरून ते अधिक प्रभावीपणे काम करू शकतात.

वरिष्ठ आणि निवड श्रेणी मिळविण्यासाठी, कर्मचाऱ्यांनी विशिष्ट कालावधीसाठी सरकारी नोकरीत काम केले पाहिजे. यामुळे, त्यांना कामाचा अनुभव मिळतो आणि ते अधिक जबाबदारीने काम करू शकतात.

सरकारी संस्थांमध्ये, वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी काही अटी असल्यामुळे, कर्मचाऱ्यांमध्ये एक स्पर्धात्मक वातावरण निर्माण होते. यामुळे, ते आपल्या कामात अधिक मेहनत घेतात आणि चांगले परिणाम मिळवतात.

सरकारी नोकऱ्यांमध्ये, वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी काही अटी असल्यामुळे, कामाचे मानक राखले जाते. या अटींमुळे, सर्व कर्मचारी एका समान स्तरावर काम करतात आणि चांगल्या प्रकारे कार्य करतात.

सरकारी संस्थांमध्ये, कर्मचाऱ्यांच्या वेतनात बदल करण्यासाठी, वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी काही अटी असल्यामुळे, अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम कमी होतो.

# दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक दिन मोठ्या जल्लोषात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

**रायगड** – युगप्रवर्तक हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा दुर्गराज किल्ले रायगडावर आज मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. छत्रपती संभाजी राजे आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय मानवंदना देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने किल्ले रायगड दुमदुमले. शिवभक्तांमध्ये मोठं उत्साहाचं वातावरण व पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या शिवभक्तांनी लोककलांचे सादरीकरण आणि पोवाडे यामुळे रायगडावरील वातावरण शिवमय झाल्याचे पाहायला मिळाले.

किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा विविध कार्यक्रमांनी पार पडला. याप्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण विभागचे संजय दराडे, जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे यासह विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीमार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले होते. या सोहळ्यानिमित्त विविध शासकीय विभाग व जिल्हा प्रशासनाने अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता, सावलीसाठी मंडप, मोफत बससेवा आदी सुविधा मोठ्या प्रमाणात पुरविण्यात आल्या होत्या. हा सोहळा पाहण्यासाठी महाराष्ट्रातूनच नाही तर देशभरातून शिवभक्त या ठिकाणी महाराजांना वंदन करण्यासाठी आले होते.

शंखनाद आणि तुतारीबरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराने रायगडचा परिसर दुमदुमून गेला होता. राज्यभरातून आलेल्या शिवभक्तांनी पारंपारीक वेषात मैदानी खेळांची, शस्त्र कवायतीचे सादरीकरण केले. पालखी सोहळ्यानंतर झालेल्या महाप्रसादाने सोहळ्याचा समारोप झाला. सोहळ्या



निमित्ताने गडावर आकर्षक विद्यूत रोषणाई करण्यात आली होती. तर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पाचाड ते रायगड पायथा या दरम्यान वाहतुक नियमन करण्यात आले होते. दोन शिवभक्तांना चक्कर येऊन पडले होते. त्यांच्यावर आरोग्य पथकांनी तात्काळ उपचार केले.

# जगातील सर्वात उंच पुलावर फडकला तिरंगा, पंतप्रधानांच्या हस्ते चिनाब ब्रीजचे उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य

**श्रीनगर** – जगातील सर्वात उंच रेल्वे पूल जम्मू-काश्मीरमध्ये तयार करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील सर्वात उंच असलेल्या या चिनाब पुलाचं आज (६ जून) उद्घाटन केलं आहे. हा रेल्वे पूल तयार झाल्यामुळे भारताच्या विकासातील एक महत्वाचा क्षण मानला जात आहे. खरं तर चिनाब नदीवर या पुलाचं बांधकाम करणं हे सर्वात मोठं आव्हान मानलं जात होतं. मात्र, हे आव्हान पूर्ण करत काही महिन्यांपूर्वी या पुलावरून रेल्वेची पहिली यशस्वी चाचणी पार पडली होती. त्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते चिनाब पुलाचं उद्घाटन करण्यात आलं आहे.



हा चिनाब पूल पॅरिसमधील आयफेल टॉवर पेक्षाही उंच आहे. खरं तर जेव्हा बांधकाम सुरू होतं तेव्हा चिनाब पूलाच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करण्यात येत होती. मात्र, आज या चिनाब पुलाचं सर्व बांधकाम यशस्वीरित्या पार पडत आणि सर्व चाचण्या यशस्वीरित्या पार करत हा पूल पूर्ण झाला असून आज या पुलाचं उद्घाटन झालं आहे. आता हा पूल खुला होणार आहे. या पुलाला पूर्ण होण्यासाठी तब्बल दोन दशकांहून अधिकचा कालावधी लागल्याचं सांगितलं जात आहे.

जम्मू-काश्मीरमधील हा चिनाब पूल भारताच्या पायाभूत सुविधांच्या प्रवासात एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. जम्मू-काश्मीरच्या विकासासाठी हा चिनाब पूल महत्वाचा टप्पा मानला जात आहे. आज या पुलाच्या उद्घाटनापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी या संपूर्ण पुलाची पाहणी केली आहे. चिनाब पुलाच्या उद्घाटनानंतर आता कटरा ते संगलदान दरम्यान ६३ किमीच्या रेल्वे मार्गावर रेल्वे सेवा सुरू होणार आहे.

दरम्यान, चिनाब पूल हा जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंकचा एक महत्वाचा भाग मानला जात आहे. या पुलाची वैशिष्ट्ये सांगायची झाल्यास हा चिनाब पूल जगातील सर्वात उंच पूल आहे. तसेच हा पूल आयफेल टॉवर टॉवरपेक्षा पूल उंच असून या पुलाच्या बांधकामासाठी २२ वर्ष लागले आहेत. तसेच या चिनाब पुलासाठी १५ हजार कोटींपेक्षा जास्त खर्च करण्यात आल्याचं सांगितलं जातं.

# शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

**कुंभेफळ /छत्रपती संभाजीनगर** – इंडियन फायर सर्व्हिस इंजिनिअरींग ॲण्ड सेफ्टी मॅनेजमेंट खाजगी आयटीआय, कुंभेफळ येथे शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे व्हिडिओद्वारे उद्घाटन हे होते, जे मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची संकल्पना मा.ना.श्री. मंगल प्रभात लोढा, मंत्री - कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांच्या मार्गदर्शनाखाली साकारण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वजीत पाटील सर यांनी केले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. शिवाजी दिवेकर (माजी जिल्हाधिकारी) उपस्थित होते. तसेच श्री. सुधीरभाऊ मुळे, सरपंच कुंभेफळ आणि प्रमुख वक्ता सौ. सीमा गाडेकर, उपकार्यकारी अभियंता, महापारेषण यांचीही उपस्थिती लाभली.

श्री. राजेंद्र खंडेलवाल, संचालक - इंडियन फायर सर्व्हिस इंजिनिअरींग ॲण्ड सेफ्टी मॅनेजमेंट आयटीआय यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्यरीत्या पार पाडले.

या वेळी कुंभेफळ येथे शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला मानवंदना करून सर्वांनी स्थानिक, ग्रामपंचायत कर्मचारी, पंचायत समिती पदाधिकारी, शाळेचे माजी विद्यार्थी, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन केले.

कार्यक्रमात शिवचरित्र, शिवप्रेरणा गीत, व राज्याभिषेक महत्त्व, तसेच पर्यावरण दिन यावर आधारित सांस्कृतिक सादरीकरण व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

प्रशिक्षणार्थ्यांनी स्थानिक कुंभेफळ शेंद्रा गावामध्ये भव्य बाईक रॅली काढून पर्यावरण आणि शिवाजी महाराजांच्या कार्याची बॅनर व घोषणांद्वारे जनजागृती केली.

शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनाच्या वेळी इंडियन फायर सेफ्टी आयटीआयच्या प्राचार्य मा. सौ. स्मिता वाणी मॅडम, गटनिर्देशक गवळी सर, आचार्य सर, तांबे सर, काकडे सर, विश्वजीत पाटील सर, कुशल पाटील सर, उपाध्ये सर, इंगळे मॅडम, सूर्यवंशी मॅडम, कोमल मॅडम, डॉ. बालखंडे सर,



डॉ. ढाबे सर व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने व महाराष्ट्र गीताने करण्यात आला आणि उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे स्मरण करत अभिमान व्यक्त केला.

कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे सौ. स्मिता वाणी मॅडम यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# संवर्धन व संरक्षण समिती बल्लारपूर तर्फे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण व सत्कार

ज्योतिर्मय साहित्य

**बल्लारपूर / प्रेम गहलोत** – पर्यावरण दिनाचे औचित्य साधत संवर्धन एवं संरक्षण समिती बल्लारपूरच्या वतीने आज शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व वृक्षवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरण रक्षण आणि ''एक वृक्ष आईच्या नावाने'' या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विशेष आवाहनाला प्रतिसाद देणे हा होता.

गेल्या काही दिवसांपूर्वी लोकनेता व विकासपुरुष सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रपूर येथे पर्यावरण विषयक एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद संपन्न झाला होता. त्याच अनुषंगाने आज समितीकडून वृक्षारोपण



कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमातच चंद्रपूर जिल्हा ग्रामीण भाजपा अध्यक्षपदी तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल आदरणीय हरीश शर्मा यांचा समितीच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात संवर्धन व संरक्षण समितीचे अध्यक्ष काशीनाथ सिंह आणि सचिव परविंदर अरोरा यांनी प्रतिवर्षी हा उपक्रम अधिक व्यापक प्रमाणात राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, ''कोणीही वृक्ष लावू इच्छित असल्यास समिती त्यांना मोफत रोपे पुरवेल.''

या प्रसंगी राजू मूंदड़ा (बल्लारपूर बस्ती व्यापारी मंडळ अध्यक्ष) हनुमान सिंह, हिरा सोनी, गोपाल अरोरा, चंदन गहरेवार बाबू सिंग बिलारिया, नरेंद्र तीलोकांनी, किशोर तीलोकांनी, मोनू तीलोकांनी, आबिद भाई, रिंकू गुप्ता यशपाल सिंह, कुलबीर अरोरा, बलवीर अरोरा संकेत जांभुळकर व इतर मान्यवर उपस्थित होते.







– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## व्यक्तीची ओळख तिच्या विचारांवरून होते


ज्योतिर्मय साहित्य

आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो.

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते. खरे तर, इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते.

अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच.

## पर्यावरणाचे सदिच्छा दूत




ज्योतिर्मय साहित्य

पौर्णिमाताईच्या संसाराच्या कल्पना चारचौघींपेक्षा वेगळ्या होत्या. गाडी, बंगला, साड्या, दागिने या गोष्टीत त्यांचं मन रमणे शक्यच नव्हते. कमीतकमी गरजा ठेवणे, उपभोगाच्या वस्तूंवर नियंत्रण आणणे, ऊर्जेचा, नैसर्गिक साधनसंपत्तीचा कमीतकमी वापर करणे ही तत्वे त्यांनी मनाशी ठरवली होती.

१९९३ मध्ये दिलीपदादा आणि पौर्णिमाताई आपल्या मुलासह कोकणातील पंचनदी या गावी राहायला आले. त्या ठिकाणी त्यांच्या काही मित्रांनी एक प्रकल्प सुरु केला होता. दिलीपजींनी चार वर्षे त्या प्रकल्पाचे काम पाहिले. पण पुढे काही कारणामुळे तो प्रकल्प बंद पडला. त्यानंतर या दोघांनी १९९७ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात असलेल्या कुडावळे या गावी जाण्याचा निर्णय घेतला. तिथे त्यांनी १० गुंठे जमीन भाडेकराराने घेतली. दिलीपदादा, पौर्णिमाताई यांचा संसार या ठिकाणी सुरु झाला.




दिलीपदादा आणि पौर्णिमाताई हे दोघंही खरे समाजशिक्षक. त्यांचं वाचन, चिंतन सतत सुरूच होतं. त्यातून त्यांच्या पर्यावरणविषयक जाणिवा अधिकाधिक समृद्ध होत होत्या. त्यातून जे विचारमंथन झालं त्यावरून दिलीपदादा आणि पौर्णिमाताई या निर्णयाला आले की लोकांना केवळ सल्ला देण्यापेक्षा आपण स्वतःच अशी पर्यावरणपूरक जीवनशैली जगण्याचा प्रयत्न करू या.

स्वतः पौर्णिमाताई या आयुर्वेदाच्या पदवीधर असल्याने आयुर्वेदिक औषधे, जीवनशैली त्यांना उत्तम प्रकारे परिचित होती. पण त्यांच्या असे लक्षात आले की लोकांना केवळ औषधे सांगण्यापेक्षा त्यांची जीवनशैली जर आयुर्वेदाच्या तत्वांशी मिळतीजुळती असेल तर त्याचा जास्त चांगला उपयोग होईल. त्यांना हेही लक्षात आलं की पर्यावरणस्नेही जीवनशैली आणि आयुर्वेदाची तत्वे यात कुठेही विसंवाद नाही. ते परस्पर पूरक आहेत. त्यामुळे आधी तसे वागून दाखवायचे आणि मगच लोकांना काही सांगायचे असे दोघांनी ठरवले.

कुडावळे ठिकाणी दिलीपजींनी त्यांना हवे तसं घर बांधलं. त्यांना पर्यावरणपूरक असं मातीचच घर हवे होतं. तस त्यांनी बांधून घेतलं. जमिनीचा तळही मातीचाच. ही जमीन शेणाने सारवायची. थोडी शेती, थोडं बागकाम करायचं असा त्यांचा दिनक्रम सुरु झाला. छोट्याशा कौलारू घरात शांत, सुखी आणि समाधानी जीवन जगण्याचा आनंद ते घेतात. पण केवळ शेती, बागकाम यातच त्यांना अडकून पडायचं नव्हतं. आधी केले मग सांगितले या उक्तीचा प्रत्यय या दोघांनी लोकांना आणून दिला. त्यांनी प्रबोधनात्मक लेखनाला सुरुवात केली. हळूहळू त्यांच्याकडे विचित्र नजरेने पाहणाऱ्या लोकांच्या नजरा कौतुकात बदलायला सुरुवात झाली. त्यांना व्याख्यानांची निमंत्रणे यायला लागली. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## नामस्मरणभक्ति

ज्योतिर्मय साहित्य

दशक चौथा, समास तिसरा


नमस्कार भगवंत भक्त मंडळी

तिसऱ्या समासात आपण किर्तन भक्ति अभ्यासली आता आपण नामस्मरणाचा विचार या तिसऱ्या समासात करूया. सतत देवाचे स्मरण करावे. अखंड नामजप करत रहावा. थोडक्यात तिन्ही त्रिकाळ नामजप करावा. ज्यांना कामाच्या व्यापात नामस्मरणाला वेळ देता येत नसेल त्याने वेळ मिळेल तेव्हा नामजप करावा. माणसाने सुख मिळाले तरी किंवा दु:ख मिळाले तरी,अस्वस्थ असले तरी,मनाची खुप घालमेल होत आहे काय करू मी या विवंचनेतून कसा बाहेर पडू अशीही अवस्था असेल तेव्हाही नामजप करावा. प्रपंचातील सर्व प्रकारच्या प्रसंगात नाम घेत रहावे. दिला दैनंदिन जीवनात नामाचा विसर पडतो तो पडू देऊ नये. आयुष्यात कधी आनंद असतो कधी दु:खद प्रसंग असतात हा ऊन सावलीचा खेळ चालायचाच म्हणजेच खुप काही मला मिळालं आहे आता मी भगवंताचे नामस्मरण का करू ? असे विचार सुद्धा मनात आणु नका. सर्व चांगल्या वाईट प्रसंगात नामस्मरण साधना चालू ठेवावी.

मित्रांनो तुम्ही म्हणाल की नाम, नाम, असं सारखं म्हणतात तर या नामामुळे काय साध्य होणार आहे. तर आपल्या संतांनी नामा सारखं दुसरं साधं सोप्प औषध या जगात सापडणार नाही असं सांगितले आहे. नाम म्हणजे भगवंताचे नाव. नाम हे जीव व शिव यांच्या मधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे व साध्यही आहे. भगवंत मुळात जो निर्गुण, निराकार आहे.

तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नाम-रूप लागले. सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले. सगुण व निर्गुण भक्तिला नामाचाच आधार आहे. नाम म्हणजे आपली भक्ति व भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. नववधू जशी नवरा त्याचे घरातील माणसे यांच्याशी जशी एकरूप होऊन जाते. **(क्रमशः)**

## नामात दृढभाव कसा येईल?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामात प्रेम नामानेच येणार. हे प्रेम यायला विषयावरचे प्रेम कमी करायला पाहिजे. दृढनिष्ठा पाहिजे. नामच तारील, नामच सर्व काही करील, असा दृढभाव पाहिजे. तो ठेवून व्यवहारातले प्रयत्न चालू ठेवावेत, पण यश देणारा परमात्मा असा भाव पाहिजे. वैद्याकडचे औषध आपण गड्याकडून आणवतो, पण गुण गड्याने दिला असे नाही म्हणत. याच्याही पुढे जाऊन, वैद्याच्या औषधाने आलेला गुण परमात्म्यानेच दिला, असे का मानत नाही ? परमात्म्याला शरण जाणे म्हणजे परमात्मा आपला आहे, त्याच्यावाचून आपल्याला दुसरे कुणी नाही, आपण काही करीत नसून सर्व तोच आपल्या हिताकरिता करतो आहे, असा दृढ विश्वास ठेवणे. आपण आपल्या बायकोमुलांवर प्रेम करतो, कारण त्यांना आपले म्हटले म्हणून. म्हणजे प्रेम हे आपलेपणात आहे, मग परमात्म्याला आपले म्हटले म्हणजे सहजच त्याच्यावर प्रेम बसणार नाही का ? दुसरे असे की, भगवंत हा आपला जिवलग सखा आहे, तो सर्व काही आपल्या हिताकरिताच करतो आहे, असा विश्वास धरल्यावर काळजीला तरी जागा कुठे उरली ? आपली देहबुद्धी नाहीशी होण्यातच आपले हित आहे. परमात्म्याच्या ठिकाणी आपलेपणा उत्पन्न व्हायला त्याच्या नामाशी पुष्कळ सहवास पाहिजे. सिद्धीच्या, चमत्काराच्या पाठीस लागू नये; ती आपल्या मार्गात विघ्ने आहेत. उलट, त्यांनी आपल्या पाठीस लागले पाहिजे. एखाद्याला साप चावत नाही, पण त्यात विशेष ते काय आहे ? सापात काय किंवा कशातही काय, भगवद्भाव, आपलेपणा पाहता यावा, म्हणजे कोणीही आपले शत्रू होणार नाहीत. आई आपल्याजवळ आहे या भावनेने मूल जसे निर्भय असते, तसे भगवंत आपल्यापाशी आहे या भावनेने आपण निर्धास्त व्हावे.

आपल्याला ज्या गावाला जायचे आहे, त्या गावाची गाडी आली की नाही एवढे पाहावे; गाडीत कोण भेटतो याला फारसे महत्त्व नाही. समजा, गाडीत आपल्याला कोणीच भेटले नाही, तर आपण स्वस्थ झोप घेत आपल्या गावी जातो, त्याप्रमाणे आपण आपले साधन करावे. सृष्टीची तत्त्वे किती आहेत वगैरेच्या भानगडीत पडू नये, त्याचा निकाल कधीच लागायचा नाही. शंका गेल्याशिवाय नाम स्थिरच होत नाही हे लक्षात ठेवावे. देहबुद्धी जोपर्यंत आहे तोपर्यंत नामाचे महत्त्व कळणार नाही. आपला उद्धार व्हावा असे वाटत असेल तर नामस्मरण सोडू नये.

परमात्मा जसा निरूपाधिक आहे तसे नामही निरूपाधिक आहे.

***

॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## महात्म्यांचा अविर्भाव

ज्योतिर्मय साहित्य

या लेख मालेच्या प्रारंभापासून आपण भगवंता सोबत अवतीर्ण झाले त्यांचे सोबत जे महात्मे प्रभूचे नातेवाईक म्हणून, जे महात्मे श्री राधा राणीच्या सख्या म्हणून तर जे महात्मे प्रभूचे सखा, सवंगडी म्हणूनच अवतरले त्यांचा कथा आपण पहात आहोत.

चरित्र ते उच्चारावे देवें केले गोकुळी. असे म्हणतात. भगवंताच्या, संतांच्या चरित्राचे गायन श्रवण करणे हा भक्ती मार्गाचा उत्तम उपाय सांगितला आहे.

भगवंताचे ८ सवंगडी भगवंता सोबत अवतारात आले त्यांची नावे आपण मागील भागात पाहिली. हेच ८ सखा कलियुगात ही अवतरित झाले. इसवीसनाच्या १५ व्या शतकात धर्म ग्लानी आलेल्या समाजाला. यांनी नवं संजीवनी दिली.

भगवंतावर प्रेम म्हणजे त्याने निर्मित सर्व भूत्मात्रावर प्रेम. या जगताच्या कणा कणात आनंद हुडकायचा, सर्व जीव जंतुला प्रभू समजून प्रेम करायचे हे या महात्म्यांनी या अवतारात शिकविले.

मागील भागात आपण संत श्रेष्ठ श्री सूरदास यांचे अल्प चरित्र पाहिले. आता द्वापार युगात भगवंता सोबत अवतरीत झालेले अन्य सवंगडी ज्यांचा कलियुगात, अलीकडेच, अवतार झाला त्यांचे चरित्र पाहू.

२) परमानंद :- श्री परमानंद या श्रेष्ठ कृष्णभक्त कवीचे पूर्वाश्रमीचे नाव अनिरुद्ध कुमार पांडे असे होते. त्यांचा जन्म संवत १५५०, उत्तर प्रदेश मधील कन्नौज येथे झाला. आणि त्यांचा मृत्यू ज्येष्ठ शुद्ध द्वादशी संवत १५७७ मध्ये झाला. हे ९१ वर्ष जगले.

हे पूर्व जन्मी श्रीकृष्णाचा टोक नावाचा सखा होते. आणि चंद्रभागा नावाची जी राधेची सखी होती त्यांचाच हा अवतार मानला जातो. त्यांच्या आईचे नाव रमादेवी आणि वडील शंभू पांडे असे होते.

यांच्या एकूण ८३५ रचना उपलब्ध आहेत. त्यांची एक रचना अतिशय गोड आहे

आज दधि मिठो मदनगोपाल /
भावो मोही तुम्हारो झुटो /
सुंदर नयन विशाल //
बहुत दिवस हम रहे कुमुद वन/
कृष्ण तिहारे साथ //
ऐसे स्वाद हम कबहून देखो
सुनो गोपाल के नाल....

३) गोविंद दास स्वामी :

पुष्टी संप्रदायाचे संस्थापक श्री वल्लभाचार्य यांनी त्यांचे चार शिष्य आणि वल्लभाचार्यांचे पुत्र आणि शिष्य श्री विठ्ठल दास यांचे चार शिष्य असे एकत्रित आठ शिष्यांत समूह तयार केला होता. यांनाच अष्ट छाप कवी असे म्हणतात. त्यातील गोविंददास स्वामी हे श्री विठ्ठलदास यांचे शिष्य होते. यांचा जीवन काल इसवी सन १५०५ ते १५८६ असा झाला. यांची तपोभूमी गोवर्धन पर्वतावर आणि ऐरावत कुंडा जवळ जातिपुरा जवळ हे स्थान आहे येथे होती.

हे रोज गोड आवाजात भगवंताला विविध पदे ऐकवीत. हे श्री दामा यांच्या अवतार आहेत. भगवत भक्तीत ते इतके लीन होते की, सतत भगवंत आपल्या सोबत आहेत, त्यांची आपण सेवा करतो आहोत या दृढ भावाने त्यांनी भक्ती केली. गोवर्धन पर्वतावर ते जिथे रहात तिथे त्यांनी भगवंतासाठी एक झोका बांधला होता. प्रभू या झोक्यावर बसून, त्यांना आपण झोका देत आहोत, या निर्मळ भावाने, ते सदैव प्रभूची सेवा करीत.

या श्रेष्ठ संतांच्या विमल चरणावर नतमस्तक होऊ यात. प्रगाढ भक्तीची परिसीमा गाठणाऱ्या या संतश्रेष्ठ भक्तांना विनम्र अभिवादन करुयात. हरी बोल हरी बोल हरी हरी बोल मुकुंद माधव हरी हरी बोल ! श्रीमद्भगवद्गीता श्री भागवत महापुराण या धर्मग्रंथातून भगवतप्राप्तीचे अनेक उपाय सांगितलेले आहेत. आपल्या मनाला निश्चलपणा प्राप्त व्हावा, मनात विचारांची निर्मिती कमी कमी होत जाऊन ती शेवटी बंद व्हावी, मन निर्विचार व्हावे, विकारांचा प्रभाव शम दमाने कमी कमी व्हावा, सद्गुणांचा विकास व्हावा, यासाठी या धर्मग्रंथात अनेक प्रयोग दिलेले आहेत. पण आपण ते प्रयोग ऐकून सुद्धा, आपण अंगी बाणवत नाहीत. **(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं विश्वाम्बिके नमो नमः।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं मे मातृके नमो नमः।।१।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. विश्वाम्बिके, तुला नमस्कार असो. माझे आई, श्री रेणुके, तुला नमस्कार असो. नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं चन्द्रशेखरवल्लभे।**
**हे कल्याणि नमस्तुभ्यं वात्सल्यमूर्तये नमः।।२ ।।**

जगदंबिके, चंद्रशेखरवल्लभे, तुला नमस्कार असो. हे कल्याणी, वात्सल्यमूर्ती, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं करुणामूर्तये नमः।**
**स्वाहास्वस्तिस्वधारूपं धारिणे च नमो नमः।। ३ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. हेकरुणामूर्ती, नमस्कार असो. स्वाहा, स्वस्ति, स्वधा यांचे रूप धारण करणारे, (तुला) नमस्कार असो. नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं सर्वाभिष्टफलप्रदे।**
**सर्वारिष्टविनाशाय नमस्तुभ्यं नमो नमः।। ४ ।।**

जगदंबिके, सर्व अभिष्टफळ प्रदान करणारे, तुला नमस्कार असो. सर्व अरीष्टांच्या विनाशासाठी तुला त्रिवार नमस्कार असो.




ज्योतिर्मय साहित्य

खरे वैराग्य संतांजवळ असते कारण ते विवेकातून आलेले असते. स्माशनातून येताना वैराग्य येते.मैथुन नंतर ही ते येते. हे क्षण भंगूर असते. ज्यावेळी अंतःकरण मन बुद्धी ढळते त्या वेळी हे विचार वैराग्य आठवायला हवे. उत्तम वैराग्य विवेकातून येते.विवेक संतांजवळ असते.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

चंद्र तेथे चंद्रिका, शंभू तेथे अंबिका.. यातही हे स्पष्ट होते. मनाच्या उपशमाचा विचार वशिष्ठानी सांगितला. मनाला देवाचा चरणी समर्पित करणे. त्यास आवरता यायला हवे. आपले मन कोठे धावू नये, मन स्थिर असावे या मनोनाश करणे गरजेचे असते..सरूप, अरूप मनोनाश असे दोन प्रकार आहेत.मनाला शांत,निश्पंद करायचे तर ज्ञानाने, संत संगती,योग,प्राणायाम या द्वारे करावे.माणसाचे जीवनाचे अधिष्ठान हे विचाराचे आहे. रणांगणात गीतेचा उपदेश देताना कृष्ण व अर्जुन हे कसे होते तर अस्थिर मनाचा कृष्ण म्हणजे अर्जुन, आणि स्थिर मनाचा अर्जुन म्हणजे कृष्ण. या दोघात देहाच्या शिवाय अन्य फारसा फरक नव्हताच. मनाच्या बोधा साठी संत वांगमय असते. विश्वामित्र सोबत राम व लक्ष्मण सोबत गेली. विश्वामित्रांनी रामास अनेक अस्त्रे दिली,शस्त्रे दिली जी भगवान शंकराकडून मिळविली होती. अस्त्रे मंत्र सामर्थ्यावर अवलंबून होते. विश्वामित्रांनी रामचंद्र प्रभूला ज्ञानसंपन्न केले. वसिष्ठानी प्रभु रामास ज्ञान दिले तर विश्वामित्रांनी त्यांना कर्माचे अधिष्ठान दिले. कर्माला निर्दोष ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञान आंधळे व कर्म दूषित हे उपयुक्त नाही. दोन्हीं असावेत. जीवनाची धन्यता ज्ञानाने होतेच, पण कर्मनिष्ठता नसेल तर जीवन निरर्थक होईल. **(क्रमशः)**



आरोग्य संजीवनी

## आवळा पावडरचे आश्चर्यकारक फायदे

ज्योतिर्मय साहित्य

छातीत जळजळ आणि असिडीटीचा त्रास अनेकांना होत असतो. असिडीटी झाल्यावर लोक गोळ्या खातात. गोळ्या खाल्ल्यानंतर काही वेळ असिडीटीचा त्रास कमी होतो. पण नंतर पुन्हा त्रास जाणवतो. त्यामुळे जर तुम्हाला पित्ताचा त्रास कमी करायचा असेल तर तुम्ही आवळा पावडर घातलेलं पाणी पिऊ शकता.

**वजन कमी करण्यासाठी फायदेशीर**

आवळ्यामध्ये एथेनॉलिक नावाचे तत्व आढळते. यामध्ये अँटीहायपरलिपिडेमिक (चरबी कमी करणारे) आणि अँटिऑक्सिडंट्स गुण आढळतात. यामुळे आवळ्याच्या पावडरच्या सेवनाने तुमचे वजन वाढत असेल तर ते नियंत्रणात येण्यास मदत मिळते. तसंच अतिरिक्त चरबी आवळा शरीरामध्ये जमू देत नाही.

चयापचयाची क्रिया तुम्हाला व्यवस्थित करण्यासाठी आवळा पावडरचा उपयोग होतो. तुम्ही नियमित कोमट पाण्यातून आवळा पावडर मिक्स करून प्यायल्यास तुमचा पचनक्रियेचा त्रास नक्कीच दूर होतो. तसंच वजनही नियंत्रणात राहते.

**पचनक्रिया उत्तम राहते**

आवळ्याला एक आदर्श फळच म्हटले जाते. कारण यामध्ये अनेक गुण असून शरीरासाठी याचे अनेक फायदे होतात. सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे पचनक्रिया उत्तम होते. पचनक्रिया उत्तम झाली तर आपोआपच वजन कमी होण्यास सुरूवात होते. वास्तविक यामध्ये *फायबरचे प्रमाण चांगले असल्यामुळे त्रास कमी होतो. फायबर पचनक्रिया चांगली करण्यास आणि बद्धकोष्ठासंबंधी त्रास कमी करण्यास मदत करते. त्यामुळे आवळ्याच्या पावडरमुळे पचनक्रिया उत्तम होऊन अन्य त्रासापासून सुटका मिळते.

**लिव्हर निरोगी ठेवते**

अनेक अँटिबायोटिक आणि औषधांच्या गोळ्या अथवा सतत दारूचे सेवन हे लिव्हरमध्ये अनेक विषारी पदार्थांचे निर्माण करते. पण तुम्ही नियमित आवळा पावडरचा समावेश आपल्या आहारात करून घेतला तर शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यासाठी याचा उपयोग होतो. तसंच तुमचे लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी याची मदत मिळते.

**हृदय स्वास्थ्यासाठी**

एका शोधामध्ये सांगितल्यानुसार आवळ्याची पावडर हृदय निरोगी राखण्यास मदत करते. याशिवाय याचा उपयोग हायपोलिपिडेमिक एजंट स्वरूपातही होतो. यामुळे रक्तदाबासारख्या रोगांशी लढा देणे सोपे होते आणि कोरोनरी आर्टरी डिसीज अर्थात धमन्यांच्या रोगाविरोधात सुरक्षा मिळते. यामुळे हृदय रोगापासून तुम्हाला दूर राहता येते आणि हृदयाची काळजीही अधिक चांगल्या पद्धतीने घेता येते.

**प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी**


रोज आवळ्याचे सेवन हे आपल्या शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उपयुक्त ठरते. यामध्ये अँटिऑक्सिडंट्स असून इम्यूनोमॉड्युलेटरी गुण अधिक प्रमाणात असतात. ज्यामुळे प्रतिकारकशक्ती वाढते आणि आपल्याला रोगांपासून दूर राहण्यास मदत मिळते. तसंच तुम्ही नियमित आवळ्याच्या पावडरचे सेवन केल्यास अनेक रोगांपासून तुम्ही दूर राहू शकता. प्रतिकारकशक्ती अधिक वाढण्यासाठी याचा उपयोग होतो.


***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# डायरीचे पान...

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

रवींद्रनाथ यांनी आपल्या सुमारे ८० वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात अनेक पत्रे लिहिली. त्यांचा जनसंपर्क अतिशय दांडगा होता आपल्याला हे वाचून आश्चर्य वाटेल की त्यांच्या पत्रांचे १२ खंड प्रकाशित झाले आहेत. जेवढी पत्रे त्यांनी अति महत्त्वाच्या व्यक्तींना लिहिली, आहेत तेवढीच पत्रे सर्वसामान्य व्यक्तींना आणि अगदी लहान मुलांना देखील लिहिली. त्यांची पत्रे सामाजिक, राजकीय, कौटुंबिक आणि व्यक्तिगत अशा अनेक प्रकारांमध्ये मोडतात. रवींद्रनाथांच्या साहित्यामध्ये आपल्याला वास्तवता आणि कल्पकता यांचे सुंदर मिश्रण आढळते. परंतु वास्तवता हे त्यांच्या साहित्यातील प्रमुख वैशिष्ट्य आहे. तेच वैशिष्ट्य त्यांच्या पत्रांमध्ये देखील आपल्याला आढळते. पण पत्र लेखनात सुद्धा वास्तवतेची कास धरताना त्यांनी सत्य आणि सुंदर ही मूल्ये जपली आहेत. त्यांचे साहित्य मग ते कथा, कविता, नाटक किंवा कादंबरी कोणतेही असो आजही ताजे वाटते. तसेच त्यांची पत्रे देखील आजच्या परिस्थितीत सुद्धा आपल्याला कालसुसंगत वाटतात आणि मार्गदर्शक ठरतात.

रवींद्र नाथांना नोबेल पुरस्कार मिळाला आणि विश्वकवी म्हणून ते मान्यता पावले. त्यानंतर तत्कालीन माध्यमांनी त्यांच्या पत्रांना भरभरून प्रसिद्धी दिली. रवींद्रनाथ कितीही व्यस्त असले तरी पत्रलेखन स्वतः करीत. जेवढ्या गांभीर्याने ते राजकीय व्यक्तींना पत्र लिहीत, तेवढ्याच गांभीर्याने आणि आपुलकीने एखाद्या लहान मुलीला देखील पत्र लिहून तिच्याशी संवाद साधत.

रवींद्रनाथ आपल्या वागण्या बोलण्याने समोरच्या व्यक्तीला कायमचे आपलेसे करून घेत असत. त्या व्यक्तींमध्ये चांगले गुण शोधून त्याची तारीफ करीत असत. त्यामुळे प्रत्येकाला रवींद्रनाथांशी आपले संबंध असावेत, त्यांच्याशी आपली ओळख असावी असे वाटत असे आणि एकदा त्यांच्या संपर्कात आलेला माणूस कायमचा त्यांच्याशी जोडला जात असे. देश विदेशातील नेते, मित्र, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलाकार, साहित्यिक, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर आणि सामान्यातील सामान्य माणसे सुद्धा त्यांच्या मित्र परिवाराचा एक भाग होते. अशा विविध व्यक्तींना ते पत्र लिहीत असत किंवा त्यांच्या पत्रांना न चुकता उत्तरे देत असत. भानूसिंहेर पत्रावली पथे वो पथेर पांत्रे, चिठ्ठीपत्र छिन्नपत्र या आणि इतर नावाने त्यांचे पत्रसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी आपली पत्नी मृणालिनी देवी यांना लिहिलेली पत्रे चिठ्ठीपत्र या संग्रहात आहेत. आपली पुतणी इंदिरा चौधरी हिला तसेच राणी मुखर्जी या लहान मुलीला लिहिलेली पत्रे देखील प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पत्रांमधील बरीचशी पत्रे त्यांनी आपले जमीनदारीचे काम शिलाइदह येथे राहून करीत असताना लिहिली आहेत. अशी त्यांची अनेक प्रकारची प्रक्रिया असली तरी प्रामुख्याने त्यांच्या पत्रांचे वर्गीकरण औपचारिक आणि व्यक्तिगत अशा प्रकारे केले जाते. **(क्रमशः)**

**ज्योतिर्मय साहित्य**

साधारण चाळीस वर्षापूर्वी ऋतू नियमित असायचे. कालिदासाचे मेघदूत आषाढ महिन्यात घनगर्द पसरायचे आणि मग पावसाची झिम्मड सुरू होत असे.

पाऊस सुरू होणार याचा अंदाज येऊ लागला की आमच्या घरी खास बियाणासाठी ठेवलेल्या भुईमुगाच्या शेंगा फोडण्याचे काम सुरू होई. उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी म्हणून आलेल्या आत्या, काका, भावंडे सगळेच जण एकत्र माजघरात गप्पा मारत शेंगा फोडत असू.



पण एखाद्या वेळी पाऊस थोडा अगोदर वर्दी लावे. आणि मग एकच घाई उठे कारण उघडीप पडली की लगेच पेरणी करणे आवश्यक असे. अशावेळी बियाणासाठी शेंगा फोडण्यासाठी बाया (कामवाल्या मावश्या) येत. पाच पैशाला एक शेंगदाण्याचे मापटे असा दर होता ४०/५० माणसे सहज बसतील इतके आमचे मोठे माजघर होते.त्यामुळे एकत्र शेंगा फोडल्याचा तो लयदार आवाज,बायकांच्या कामाच्या वेगाबरोबरच मनाच्या गाठी पण सहज उकलल्या जात. बहुतेक सर्वजणी सासुरवास भोगत गरिबीला तोंड देणाऱ्या. आई मध्येच सगळ्यांना २/३ वेळेला चहा/भडंग देत असे..आजारी, गरोदर बाईला लोणचे देई.. आम्हीं मानाचे कुलकर्णी जरी होतो तरी परिस्थिती त्या काळी बेताचीच होती.आई, तात्या सदैव कामात असलेली बघत मी मोठी झाले. तात्या हेडमास्तर होते शाळा, शेत, जनावरे या सगळ्यात त्यांचा पूर्ण दिवस जात असे.. आई तर पहाट ते रात्रीपर्यंत वेगवेगळ्या कामात असे.पण दोघांनी आपल्या प्रेमांनी अनेक माणसे जोडली होती.आलेला अतिथी आमच्या घरून कधीच विन्मुख गेलेला मी बघितला नाही. घासातला घास सर्वांमुखी




जात असे.

हे सगळे लिहायचे कारण म्हणजे मी कधी डायरी लिहिली नाही.पण मनाच्या डायरीची पाने मात्र अनेक आठवांनी भरलेली आहेत.. आणि त्यातीलच एक हे महत्वाचे पेरणीचे पान..

भुईमुगाच्या शेंगांचे दाणे आपण घेतो. टरफले टाकून किंवा जाळून टाकावी लागतात पण ती आवश्यक असतात.. जसे आपल्या आयुष्यात येणाऱ्या कटू व्यक्ती,घटना त्यांना टाकून (विसरून ) जावे लागते पण अशा व्यक्तींमुळे, घटनांमुळे आपले पाय नेहमीच जमिनीवर राहतात. गर्व आसपासही फिरकत नाही हे पण खरेच आहे ना?सगळेच बियाणे काही रुजू शकत नाहीत. काही त्यातील किडके असतात, काही बारीक असतात. तसाच जीवनातील प्रत्येक दिवस आनंदात जाईल याची खात्री नसतेच. सुख, दुःख, संकटे ही येणारच.. तसेच मनाची भूमी कितीही सुपीक ठेवली तरी नशिबाचा ऋतू कसा असेल हे कुठे माहीत असते? कधी कोरडा दुष्काळ तर कधी आवर्षण.. तशीच काही डायरीतील पाने कोरी राहतात काही ओली चिंब होतात.मीआई, तात्यांची कृती बघून शिकलेले खूप काही आचरणात आणायचा प्रयत्न करते.

काळ बदलला,संदर्भ बदलले तरी भावना आणि वाहत्या जीवन प्रवाहातली आपले सुकाणू आपल्या मनाला योग्य दिशेला नेणारे हवे ना? माझ्या विचारांना दिशा त्यांचे आशीर्वाद देतात असे नेहमीच मला वाटते...

मनाच्या डायरीतील या पानाच्या आठवणी जुन्या स्मृतींशी जोडत आणि त्यातून खूप काही शिकत मी प्रत्येक वर्षी आठवणींची उजळणी करते. शक्य तितके कोऱ्या, दुमडलेल्या, भिजलेल्या, काही विचित्र रंगात रंगलेल्या पानांकडे दुर्लक्ष करते. किंवा त्यातून काय निवडायचे, शिकायचे हे अनुभवांनी ठरवते.पण मी नेहमीच येणाऱ्या पुढच्या दिवसाचे डायरीचे पान माझे सुंदरच असावे असा प्रयत्न नक्की करते..शेवटी माझ्या आयुष्यातील उरलेली सर्व पाने कशी असणार आहेत हे ठरविणारा तो श्रीहरी. सर्व काही त्याच्यावर सोपवून या गुरू ठाकूरच्या ओळी मी गुणगुणते..

मन नकळत भवतालाशी
जरी जुळवीत बसते ठेका
त्या पल्याड बेटावरूनी
मज ऐकू येती हाका
ही चाहूल मावळतीची
ही वास्तव हूल कळेना
मी अजून सोडला नाही
उमलत जगण्याचा हेका...

## इंदापूरी निखारे



### लग्न...



**ज्योतिर्मय साहित्य**

हा शब्दच राहिला आहे आता...

त्या शब्दातील भावना... त्या शब्दात असणारी संस्कृती, संस्कार... नाहीसे करण्यासाठी प्रयत्न करत आहोत... आता तो एक इव्हेन्ट म्हणून...

आणि व्यवहार म्हणून अस्तित्वात राहिला आहे...

असे जाणवते...

पण तरीही त्याचे महत्व राहिले आहे... म्हणजे तेव्हढ्यापुरते का होईना... आजी, आजोबांना आणि इतर काही मान्यवर नातेवाईकांना...

मोठ्या मानसन्मानाने वागवतात... तेही आनंदात...

मरण्यापूर्वीचा निरोप समारंभ समजून आनंदी होतात... पण एक गोष्ट मात्र अजूनही बदलली नाही... ती म्हणजे... मुलाची अपेक्षा... मुलीची अपेक्षा... ज्या आता मुलमुलीच ठरवतात...

आता मुलगी कशी हवी? कमीतकमी पोस्ट ग्रॅज्युएट... नोकरी करणारी... घरचे सगळे सांभाळणारी... मॉडर्न पण संस्कारी पण...

वेगळे राहणार असेल तर फ्लॅट, कार वगैरे...

कोणी हा प्रश्न पडत पण नाही...

आणि मुलगा... भरपूर पगार... स्वतःचा स्वतंत्र बंगला, फ्लॅट... कोणालाही न विचारणारा... फक्त बायकोचे ऐकणारा...

असा... पराक्रमी, धाडसी... खमक्या,दबंग...

निर्भीड,राकट... कणखर, मुत्सद्दी, प्रभावी...

वगैरे वगैरे... थोडक्यात मुलगा... धाकड हवा...

अशी अपेक्षा असायची...

त्या धाकड या शब्दानी तर... शरमेने मान खाली टाकली...

मराठीत बहुअर्थ असणारा हा धाकड शब्द...

अतिशय सन्मानाने ओळी ओळीत वावरत असतांना...

त्या धाकडमुळे शरमेने शरमिंदा झाला...

त्याच्या मुळे त्याची पण इज्जत... फक्त हायवेवर नाहीतर... गल्लीबोळात लीलावात...

मातीमोल करून टाकली...

अभिजात भाषेतील सौंदर्याने नटलेला...

धाकड शब्द धारातीर्थी पडला...

## जात्यावरच्या ओव्या......



मला मोठी हाऊस
देऊळगाव ची हिरवी नाटी
भरतार घोड्यावर
पुढे खजिन्याची पेटी ॥१११॥

पडपड पाण्या
नको आयकु जनाचं
झालं वाळवण
गाई बाईच्या धनाच ॥११२॥

*संदर्भ- शांताई इंगळे*
*संकलन- सौ. मनोरमा बोराडे*
*सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर*




### आता लवकरच पिनकोड ऐवजी येणार डिजिपीन
### डिजिपिन : पत्ता शोधणारी नवी प्रणाली

पत्ता लिहिताना आपण पिनकोड लिहितो तो ६ नंबरचा आकडा असतो, भारतातील कुठल्याही क्षेत्राला डाक विभागाद्वारे दिलेली ती ओळख असते. तरीसुद्धा एखादे कुरिअर अचूक पत्त्यावर पोहचत नाही, त्यासाठी भारतीय डाक विभागाने आता पत्ता शोधणारी नवीन प्रणाली निर्माण केली आहे. त्याला डिजिपिन (Digipin) नाव देण्यात आले आहे. यामुळे देशातील कुठलाही भाग किंवा कोपऱ्याचा पत्ता डिजिटल पणे मिळू शकतो.

डाक विभागाने IIT हैदराबाद आणि ISRO सोबत मिळून ही प्रणाली विकसित केली आहे. या सिस्टम अंतर्गत देशाला ४ मीटर बाय ४ मीटर आकाराच्या छोट्या छोट्या भागात विभाजन केले आहे. प्रत्येक भागाला एक यूनिक आयडी देण्यात आला आहे. हा आयडी १० आकडी अक्षरांचा एक कोड असेल, त्याला डिजिपिन म्हटलं जातं. हा कोड कुठल्याही जागेचा Latitude आणि Longitude वर आधारित असेल. यामुळे एखाद्या गल्लीबोळातील कुठलेही ठिकाणी सहज अचूक मिळू शकते. आता कुठल्याही कुरिअरवाल्याला किंवा व्यक्तीला एखादे पार्सल तुमच्या पर्यंत पोहचवण्यात अडथळा किंवा समस्या येणार नाही.

खूप मोठा परिसर दर्शवणाऱ्या ६ अंकी पिनकोड ऐवजी अचूक स्थान दर्शविणाऱ्या १० आकड्यांचा किंवा अक्षरांचा डिजिपीन कोड लवकरच वापरात येईल.

https://dac.indiapost.gov.in/mydigipin/home

तुम्हाला तुमचा डिजिपिन हवा असेल, तर Digipin च्या अधिकृत वेबसाइटवर गेल्यानंतर, तुम्ही तुमचा पूर्ण पत्ता किंवा जीपीएस लोकेशन तिथे नोंदवू शकता. त्यानंतर सिस्टम तुम्हाला तुमच्या लोकेशन नुसार १० अक्षरी युनिक कोड देईल. हा तुमच्या पत्त्याचा डिजिपिन असेल. हा कोड अचूक लोकेशन दर्शवितो. भविष्यात पोस्टल सेवा, ऑनलाइन डिलिव्हरी आणि सरकारी यंत्रणा देखील या डिजिपिनचा वापर करतील.




## फुलमाला....



बोगन वेल...

वसंत स्पर्शाने बोगनवेल ही बहरलेली
जणू हलकी कागदी फुले ही फुललेली

विविध रंगात फुलते ही,
प्रवेशद्वार करते शोभायमान
फुला फुलांचे गुच्छ लटकती,
झाकले जाते पान अन् पान

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



## आठवणीतले बालपण

*मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर*

*- संजय व्यापारी, संपादक,*
*ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.*

संपादक, ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.

# वृक्ष बेवारस आहेत काय?

ज्योतिर्मय साहित्य

अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा कित्येक प्रकारची झाडे असतात. ही पायी चालणाऱ्या वाटसरुंना, परिसरातील जनावरांना आपली छाया देतात. उन्हाळ्यात चेत्रापासून सूर्य आग ओकू लागल्यावर वटवृक्ष आपल्या गर्द छायेत कित्येक पशूंच्या जीवास आरामदायक ठरतो. त्याच्या पानामधून हलके तुषार कधी कधी जमिनीवर पडत असल्याने परिसरात हिरवाई ही असते जी तृणभक्षी प्राण्यांना उन्हाळ्यात उपयुक्त ठरते.वटवृक्ष, कडूलिंब, औदुंबर, पिंपळ हे वृक्ष हे काम करत असताना, पावसाळ्यात हीच झाडे पंधरा पंधरा फूट खाली पाणी नेण्याचे व साठवण्याचे कार्य करतात. पक्ष्यांना त्यांची फळे कोवळी पाने खायला मिळतात तर त्यावर बसणारे किटक ही खायला मिळतात. आपणा मानवांना सावली आणि आपल्या वाहनांना सुध्दा सावली ही झाडे प्रदान करतात.आज पर्यावरण दिनानिमित्त आणि काही ठिकाणी तोडून पडलेल्या झाडांकडे पाहून लिहावे वाटले.



अनेक झाडे आपोआपच उगवतात, आणि वाढतात. काही झाडे वृक्षप्रेमी वृक्षारोपण चळवळीतून झाडे लावून संरक्षण व संवर्धन करतात. नव्याने झालेल्या रस्त्याच्या कडेला शासनाने बरीच झाडे लावलेली आढळतात. सामाजिक वनीकरण विभागाकडून अनेक ठिकाणी वृक्ष लावले जातात. हे लावलेले व वाढलेले वृक्ष यांची नोंद कुणी ठेवते किंवा नाही हे माहिती नाही. ते ठेवायला हवे.कारण आजकाल कुणीही बिनदिक्कतपणे कुर्हाड त्यावर चालवतात. पूर्वी कुऱ्हाड होती आता जेसीबीच्या द्वारे झटक्यात समूळ उच्चाटन केले जाते आहे.

अनेक उपनगरात राखीव प्लाँटमध्ये कुणी झाडे लावतं, मंदिर उभारतात, कुणी बाग करतात कुणी लहान मुलांसाठी खेळणी लावतात, कुठे नानानानी पार्क करतात. श्री.अशोकराव माळी यांनी पांडुरंग उद्यान दत्त नगर मध्ये परिसरातील लोकांच्या मदतीने सुंदर केले आहे. काही ओपन प्लाँटमध्ये तेथील नागरिकांना, सेवानिवृत्त नागरिकांना बसण्याची व्यवस्था व झाडे लावली आहेत. पण अशा खुल्या जागेत लावलेल्या झाडांच्या नोंदी कुणी ठेवायच्या?आमचे मित्र करकंब येथील रहिवासी ज्ञानेश्वर दुधाने सर यांनी ''लेकीचे झाड'' नावाचे वृक्षारोपण व संवर्धनाची चळवळ मोठ्या प्रमाणावर राबवित आहेत. आज त्यांनी केलेल्या कष्टाचे चिझ झालेले पहावयास मिळते आहे.



दत्ता तरलगट्टी
मुक्त पत्रकार, पंढरपूर

रस्त्यासाठी झाड तोडले पण रस्ताच झाला नाही, तर काय करावे?लावलेल्या झाडांची नोंद कुठले शासकीय कार्यालय ठेवते की नाही?रस्त्याच्या कडेला असणाऱ्या झाडांची नोंद,ओपन प्लाँटमधील झाडांची नोंद असणे आवश्यक आहे. मागे वाचनात आलेल्या बातमीत, कोर्टाने झाडे तोडणाऱ्यास शंभर झाडे लावण्याची शिक्षा फर्मावली होती. हल्ली कुणाचाच कुणावर वचक राहिला नाही. असे दिसून येते.

वृक्ष हे बेवारस आहेत का?नाही ते बेवारस नसतात कुणी तरी आपल्या पूर्वजांच्या स्मृती प्रित्यर्थ लावलेले असतात. तर कुणी आनंदाच्या क्षणी लावतात. कुणी आपल्या मातापित्यांच्या अस्थी नदीत विसर्जन करण्या ऐवजी खड्डा खांदून तिथे वृक्ष लावतात. मग अशी झाडे बेवारस कशी असू शकतील?आमच्या परिसरातील झाड निर्दयी पणे जी.सी.बी.ने समूळ नष्ट करताना आम्हाला वाईट वाटले. कारण ते झाड सौभाग्यवतीने तिच्या वडिलांच्या स्मरणार्थ लावले होते.शेजारच्या पाटील सरांनी त्यास पाणी देण्याची व्यवस्था केली होती. आम्ही खत वगैरे टाकून आठ दहा वर्षे सांभाळले. उन्हाळ्यात त्या गुलमोहोराला छान फुले फूलू लागली होती. अवकाळी पावसाने भरपूर पाणी झाडांना मिळाल्याने तोडलेल्या झाडा जवळचे वृक्ष हिरवेगार टवटवीत दिसू लागले आहेत. ते पाहून त्या तोडलेल्या झाडास काय वाटत असेल? टवटवीत होणाच्या अवस्थेत असताना ते झाड संपवले.अशी अनेक झाडे कित्येक ठिकाणी पडलेली दिसतात. त्या झाडांच्या मोठ्या लाकडाचा उपयोग योग्य कारणासाठी व्हायला हवा असे वाटते. पंढरपूरात काही बेवारस व्यक्ती गतप्राण होतात. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी अशी झाडे वा ती लाकडे वापरली गेली म्हणजे त्या झाडांनाही बरे वाटेल. कैक ठिकाणी अशी झाडे रस्त्याच्या दुतर्फा पडलेली दिसून येतात त्या वरून ऐवढा लेख प्रपंच !!

# खजिना

ज्योतिर्मय साहित्य

आयुष्यात अनेक आठवणी खूप मौल्यवान असतात. एखादा आनंद किंवा क्षण आपण पहिल्यांदाच अनुभवत असतो, त्याच्या आठवणी एखाद्या अनमोल खजिन्या पेक्षा कमी नसतात. तसाच एक बहुमोल खजिना आज मला सापडला. सासुबाईची पैठणी, स्त्रीच्या सगळ्यात जवळचे वस्त्र म्हणजे साडी... आणि ती साडी लग्नातील किंवा विशेष सोहळ्यात नेसलेली असेल तर ती बाईच्या खूप जवळची होते. मग तिच्याशी जोडलेल्या आठवणी म्हणजे एक खजिनाच असतो.



आमच्या ताईच्या लग्नात नेसलेली ही आईची पैठणी! १३ वर्षे वय असलेली ही आईची सखी आज मला भेटली. मुलीच्या लग्नातील जबाबदारीच्या जाणीवेने कमरेला खोचलेले पदराचे ठोक त्यांच्या धावपळीची आठवण करून देत होते. किती ही हौशीने पैठणी घेतली तरी ती नेसून बाईला काम चुकत नसतं. संसाराच्या जबाबदारीचे बळ मिरवलेली ही पैठणी ! पदरावरचे मोर पाहत हळूच पदरावरून हात फिरवला, तोच मुलीच्या पाठवणीचे अश्रू पुसुन भिजलेला पदर हातात आला. सांगत होता, काळजाच्या तुकड्याला हसत – हसत दुसऱ्याच्या घरी पाठवणं सोपं नसतं बाई...! लगेच आईचा माझ्या पाठवणीचा रडवेला चेहरा आठवला मला. असो, आईच्या त्या हळव्या क्षणांची सोबत केलेली ही पैठणी !

सौ. प्रियंका गौरव जावळे
छत्रपती संभाजीनगर

आरशा समोर उभी राहिले, ना भरजरी वर्क, ना झगमगीत खडे, कपाटातून काढलेली कडक इस्त्रीची ही ठेवणीतली पैठणी इतकी सुंदर दिसत होती की आज कालच्या या शो ऑफ च्या जमान्यात हीचं सौंदर्य काही औरच होत. अगं किती छान आहे साडी, असं म्हणणाऱ्या २०/२५ जणींना तरी, सासुबाईची आहे ! हे जेव्हा मी सांगत होते, तेव्हा चेहऱ्यावरचा आनंदच सारं काही सांगत होता. मुलगी म्हंटले की आईच्या साड्या अगदी लहानपणापासून कायमच नेसत असते. आई ही तीला हौशीने नेसवते. पण सुनेला ही तितक्याच हौशीने नेस माझी साडी म्हणणाऱ्या ह्या आमच्या आई, ते ही लेकीच्या लग्नातली अनंत आठवणींनी सजलेली पैठणी... त्या पैठणी च्या मऊसुत पोता प्रमाणे प्रेमळ अशा आईनी सुनेवर आपलेपणाने ठेवलेल्या विश्वासाचे वजन पैठणीच्या पदराच्या घडीत सांभाळत मी भरपूर मिरवले. संसारात अनेक प्रसंग येतात पण अशा जुन्या अनुभवांची शिदोरी घेऊन सासुबाई मागे उभ्या असतील तर पदर खोचून उभं राहताना सुन डगमगत नाही. तर असा हा आईपणाच्या, बाईपणाच्या अनुभवांनी भरलेला खजिना मला मिळाला, नेसतांना प्रत्येक घडी उघडतांना मनात आलेल्या या भावना...

थँक यू आई....

# विष्णु घुलेनीं साकारली श्री छत्रपतींच्या राजमुद्रेची अलौकिक कलाकृती ...

ज्योतिर्मय साहित्य

जगप्रसिद्ध अजिंठा लेणीच्या जवळच अभिजात कलावंत विष्णू घुले यांनी भारत दर्शन वस्तू संग्रहालय उभे केलेले आहे. विष्णू घुले यांनी अनेक टाकावू वस्तूंचा वापर करून अनेक नाविन्यपूर्ण कलाकृतींची निर्मिती केली आहे. लग्न पत्रिका, फोम शिट, स्त्रीयांची आभूषणे, प्लास्टिक खेळणी, मणी, प्लास्टिक जाळी, झुंबर, ग्रिटींग कार्ड, वेलवेटचं कापड, क्रिस्टल साखळी, फ्रिजचे स्पेअरपार्ट, गारगोटी, शो बटन्स अशा अनेक टाकावू वस्तूंचा वापर करुन त्यांनी श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजमुद्रेचीही कलाकृती साकारलेली आहे.



या कलाकृती मध्ये राजमुद्रा एका अष्टकोनी समतल पृष्ठभागावर ठेवण्यात आली आहे. हा समतल पृष्ठभाग अष्टकोनी घेण्याची संकल्पना अशी आहे की, श्री शिवछत्रपती यांच्या विचारात अष्टौप्रहर स्वराज्य वाढवण्याची कल्पना होती. राजमुद्रेतील स्वराज्याचा आशय प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी श्री. शिवछत्रपती यांनी अष्टप्रधान मंडळावर सोपवली होती. त्यासाठी राजमुद्रे भोवती अष्टप्रधानांची प्रतिक ठेवण्यात आले आहे.




आठ कोन ठेवण्याची आणखी एक संकल्पना अशी आहे की अष्टौप्रहर स्वराज्य संकल्पनेच्या विचारांचा प्रचार, प्रसार व अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष कृती पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर या मुख्य दिशा व आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य व ईशान्य या उपदिशांना सुद्धा झाला पाहिजे.

राजमुद्रा तीन स्तंभावर स्थिर ठेवण्यात आली आहे, यामागील संकल्पना अशी आहे की श्री. शिवछत्रपतींनी सामान्य लोकांमधून असामान्य ''स्वराज्य'' निर्माण केले. या सामान्य माणसातील तीन गुणांना श्री.शिवछत्रपतींनी नेहमीच प्रोत्साहित केले.

१. एक त्यांचा ''स्वाभिमान'' जागृत केला

२. दुसरे त्यांना ''कर्तव्य'' ची जाणीव करुन दिली.

३. तिसरे त्यांना''राष्ट्रप्रेम '' म्हणजे ''स्वराज्य'' साठी समर्पन, त्याग करण्याची भावना प्रबळ केली

या तीन गुणामुळेच औरंगजेब सुद्धा ''स्वराज्य'' पुढे पराभूत झाला.

या राजमुद्रेवर तीन कमानदार दरवाजे दर्शविले आहे याची मुख्य संकल्पना अशी आहे की स्वराज्य म्हणजे रयतेचे राज्य होय ही संरचना तीन विभागावर होती. शासन, प्रशासन, आणि न्यायदान या तीनही क्षेत्रांवर श्री. शिवछत्रपतींचे अभुतपूर्व वर्चस्व होते त्यामुळेच या तीन ही कमानदार दरवाज्यातून स्वराज्याचा हा विजयी अश्व चौखूर धावु लागला.

कलाकृती मध्ये समोरच एक ''अश्व'' दाखवण्यात आला म्हणजे श्री. शिवछत्रपतींची या तीन ही प्रशासकीय रुपी अश्वावर पक्की मांड होती त्यामुळे स्वराज्य निर्मिती ही एक अभुतपूर्व आणि युगप्रवर्तक घटना होती.

ही कलाकृती साकारण्यासाठी अतिशय सामान्य (टाकाऊ) वस्तू वापरण्यात आल्या आहेत कारण टाकाऊ वस्तूंना सुद्धा योग्य आकार, उकार मिळाला तर अद्वितीय कलाकृती साकारु शकते, त्याच पद्धतीने सर्व सामान्य भारतीयांनी राष्ट्रभक्ती ची भावना प्रबळ केली तर असामान्य कार्य करुन निश्चित भारताचे भविष्य बदलू शकतो.

विष्णू घुले सारख्या गुणी कलावंतानी टाकावू वस्तूंचा वापर करून भारतातील अनेक राष्ट्रीय स्मारक, गड किल्ले अनेक मंदिरे यांच्या अप्रतिम कलाकृतीची निर्मिती केलेलीं आहे. विष्णू घुलेच्या अनमोल कलाकृती पाहिल्यावर डोळे दिपून जातात. विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी अनेक वर्षांच्या आपल्या परिश्रमातून विष्णू घुले यांनी या कलाकृतींचे संग्रहालय उभे केलेले आहे ते कसल्याही प्रकारचे शुल्क न घेता सगळ्यांना विनामूल्य खुले ठेवलेले आहे ही गोष्ट मोलाची आहे. अशा अलौकिक कलाकृतीची निर्मिती करणाऱ्या कलावंताचा मोबाईल नंबर खाली देत आहे आपणं त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी.

विष्णू घुले मो.७५८८८५०७०८

अजिंठा लेणीच्या जवळच ''भारत दर्शन वास्तु संग्रहालय'' आहे आपणं देखील कलावंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी आपल्या मुलां बाळासह जरुर जरुर पहावे असे मला वाटते...

***

# निबार चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित १३ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार

ज्योतिर्मय साहित्य

मराठी चित्रपटसृष्टीने नेहमीच विविधांगी विषयावर चित्रपट बनवत जगभरातील प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याचा वसा जोपासत समाजातील वेगवेगळ्या मुद्द्यांवर भाष्य केले आहे. प्रदर्शनासाठी सज्ज असलेला निबार हा आगामी मराठी चित्रपटही याच वाटेने जाणारा आहे. शिक्षणासह समाजव्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या निबार चित्रपटाचे पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. १३ जून रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

निर्माते संतोष भणगे, अनिकेत माळी आणि भरत सावंत यांनी ध्रुव फिल्म्स अँड एन्टरटेन्मेंटच्या बॅनरखाली निबार चित्रपटाची निर्मिती केली आहे. जितेंद्र भास्कर ठाकरे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. सुनील शिंदे यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. प्रदर्शित करण्यात आलेल्या निबारच्या पोस्टरवरील मराठी चित्रपटसृष्टीतील मातब्बर कलाकारांचे चेहरे पाहता क्षणीच लक्ष वेधून घेतात. गाजलेल्या मालिका आणि चित्रपटांद्वारे महाराष्ट्राच्या घरोघरी पोहोचलेला अभिनेता शशांक केतकर या चित्रपटात मुख्य भूमिकेत असून, त्याच्या सोबतीला अभिनेत्री सायली संजीव आहे. मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टी गाजवणारे शशांक शेंडे यांची या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका आहे. याखेरीज देविका दफ्तरदार आणि अरुण नलावडे यांच्याही भूमिका आहेत. पोस्टरवर दिसणाऱ्या या सर्व कलाकारांच्या जोडीला सुर्योदयाच्या पार्श्वभूमीवर पाच लहान मुले चालताना दिसतात. त्यावरून या चित्रपटाची कथा त्यांच्याभोवती फिरणारी असल्याचे जाणवते. शांता तांबे, राजेश दुर्गे आणि अनिकेत माळी यांनीही या चित्रपटात वेगवेगळ्या व्यक्तिरेखा साकारल्या आहेत.




राजेश दुर्गे आणि सुनिल शिंदे यांनी निबारची पटकथा व संवादलेखन केले आहे. गीते वैभव देशमुख यांनी लिहिली असून, संगीत व पार्श्वसंगीत रोहित नागभिडे यांचे आहे. आदर्श शिंदे आणि रोहित राऊत यांनी या चित्रपटासाठी गायन केले आहे. छायालेखन धनंजय कुलकर्णी यांनी, तर संकलन सुनिल जाधव यांनी केले आहे. सतिश बिडकर यांनी कला दिग्दर्शन केले असून, साऊंड डिझाईन अभिजीत देव यांनी केले आहे. शिरीष राणे कास्टिंग व लाईन प्रोड्युसर, तर अमोल गायकवाड कार्यकारी निर्माते आहेत.




# पुणे जिल्हा शिक्षण मंडळात साकारतोय विद्यार्थी गुणवत्तेचा पीडीईए पॅटर्न

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे –** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विविध शाळांनी कला, क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. दहावी, बारावीबरोबरच इतर स्पर्धा परीक्षेतही विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. राज्याचे उपमुख्यमंत्री, संस्था अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या उपक्रमांमुळे विद्यार्थी गुणवत्तेचा पीडीईए पॅटर्न साकारत आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अॅड. संदीप कदम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील संस्थेच्या गुणवत्तेचा आढावा घेताना घाडगे, अॅड.कदम बोलत होते. यावेळी खजिनदार अॅड.मोहनराव देशमुख, उपसचिव एल.एम. पवार, सहसचिव ए.एम. जाधव उपस्थित होते. यावर्षी दहावीचा निकाल ९७.८२ टक्के लागला. बारावीत विज्ञान शाखेचा ९९.०७, वाणिज्यचा ९४.३६, कलाचा ८७.३३ तर व्यवसाय शाखेचा ९२.९२ टक्के निकाल लागला. हे सर्व निकाल राज्य, पुणे विभाग जिल्ह्याच्या तुलनेत जास्त आहेत.

गणित, इंग्रजीचा मूलभूत संबोध स्पष्ट होण्यासाठी पाचवी ते दहावीसाठी संबोध परीक्षा घेतली जाते. यापुढे विज्ञानाचीही संबोध परीक्षा होणार आहे. अमेरिकेच्या कॅलिफोर्नियातील कॉंग्रेटिव्ह एक्सचेंज या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थांच्या नेतृत्व आणि व्यक्तिमत्व विकासासाठी कॉंग्रेटिव्ह एक्सचेंज उपक्रम दहा वर्षापासून राबविण्यात येतो. त्यात २४ शाळांतील विद्यार्थी सहभागी आहेत. भाषिक कौशल्ये आणि पायाभूत क्षमता विकसित करण्यासाठी सहा शाळांमध्ये लीड टू एक्सेल हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवला जातो.

शासकीय एलिमेंटरी चित्रकला परीक्षेसाठी संस्थेच्या ५९ शाळांतील २६५० पैकी २६२३ तर इंटरमिजीएट परीक्षेत २३१७ पैकी २२९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नवी दिल्लीतील केंद्रीय संस्कृत विद्यापीठाच्या संस्कृत शिष्यवृत्तीत चार शाळांतील ९ वी ते ११ वीचे ३१ विद्यार्थी पात्र ठरले. त्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये शिष्यवृत्ती मिळाली. आठवीसाठी घेतलेल्या एनएमएमएस परीक्षेत आठ विद्यार्थी पात्र झाले. छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी ८४ विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यांना पुढील चार वर्षासाठी प्रत्येकी नऊ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे.

स्काऊट आणि गाईड राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेत २२ शाखांमधून ८० स्काऊट आणि १०५ गाईड मिळून १८५ विद्यार्थी राज्य पुरस्कारासाठी पात्र ठरले. तामिळनाडूमधील तिरूचिलरापल्लीत ''भारत स्काऊट आणि गाईड राष्ट्रीय कार्यालयाच्या वर्धापनदिनानिमित्त राष्ट्रीय गाईड जांबोरी मेळावा झाला. त्यामध्ये घोटवडे शाखेतील ८ गाईड आणि एक गाईडर सहभागी झाले होते.

केंद्र सरकारच्या खाद्य व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या भारतीय मानक ब्यूरो संस्थेच्या माध्यमातून ५८ शाखांमध्ये बीआयएस क्लबची स्थापना केली. या क्लबच्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत अशितोष अटोळे (संविदणे), ईरिका वासनिक (सांगवी) आणि दिव्या फाटे (उत्तमनगर) यांचे प्रथम तीन क्रमांक आले.

विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने घेतलेल्या इन्स्पायर अवार्डसाठी संस्थेच्या १७ शाखांमधील २४ विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाची निवड झाली. ४८ शाखांमधील २६१ विद्यार्थ्यांना सामाजिक संस्थांकडून २३ लाख ७० हजार १५९ रूपयांची फेलोशिप मिळाली. नागरी आणि वाहतूक सुरक्षा पथकाच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी २६ शिक्षकांना आरएसपीचे प्रशिक्षण दिले. पिरंगुट विद्यालयात एनसीसी अभ्यासक्रम सुरू केला. विद्यार्थांनी वापरलेल्या वह्या आणि उत्तरपत्रिकेतील कोऱ्या कागदांपासून सहकारी मुद्रणालयात ७२० वह्या तयार करून त्या २९ शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना दिल्या. विद्यार्थ्यांना अल्प किंमतीत अभ्यासपूरक साहित्य मिळण्यासाठी संस्थेच्या प्रकाशन विभागात प्रयोगवह्या, चित्रकला, गणित आणि इंग्रजीच्या कार्यपुस्तिका छापल्या जातात. दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी व परीक्षेनंतर ताणतणाव व करीअरच्या अनुषंगाने संस्थेतील १४ शिक्षक समुपदेशकांच्या मार्फत स्वतंत्र हेल्पलाईनच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559